| MHKO160004402017 | रे.क.नं. ८५/२०१७ मधील नि. ८४ खालील आदेश |
|---|---|

१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा मिळकतीचे मालक असलेचे हक्कज्ञापन होऊन मिळणेसाठी व कायम मनाईचा दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. ६ यांना दि.०९/०८/२०१७ रोजी समन्स लागु झालेले आहे. प्रतिवादी नं. ६ यांनी तुर्तातुर्त मनाई अर्जास लेखी म्हणणे दिले असुन त्यांना मूळ दावेचे कामी स्वतंत्र लेखी कैफियत देणेची आहे. दरम्यान वादीने तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दि. २४/०१/२०२३ ला चालवणेचा नाही असे लिहून दिलेने काम पुढील तजवीज वर नियुक्त करणेत आले होते. प्रतिवादी नं. ६ यांनी तुर्तातुर्त मनाईचे कामी स्वतंत्र लेखी म्हणणे दिले असलेने त्यांना दावेचे कामी स्वतंत्र कैफियत देणे आवश्यक आहे याची माहिती व कल्पना दिली नव्हती. सदर कामी दि.१३/०२/२०२४ इ.रोजी मे. कोर्टाने प्रतिवादी नं. ६ विरुध्द लेखी म्हणणे नाही/ कैफियत नाही म्हणुन आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी नं. ६ यांना आपले कायदेशीर हक्क शाबित करणेकरीता स्वतंत्रपणे लेखी कैफियत देवून सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणणेची आहे.

२. सदर अर्जात प्रतिवादी नं. ६ यांनी कथन केले आहे की, सबब समन्स बजावणी पासून कैफियत दाखल करणेस आजअचोर तांत्रिकदृष्ट्या ७ वर्षे ४ महिने व २८ दिवस व प्रतिवादी नं. ६ विरुध्द लेखी म्हणणे नाही/ कैफियत नाही म्हणुन आदेश पारीत होवून कैफियत देणेस ९ महिने १९ दिवसांचा विलंब झालेला आहे. वास्तविक कैफियत देणेसाठी सी.पी.सी. ऑर्डर ८ रुल १ मध्ये ९० दिवसांचा कालावधी नमुद असला तरी सदरची तरतुद ही बंधनकारक नसुन फक्त सुचना/मार्गदर्शक आहे. कैफियत नाही असा झालेला आदेश रद्द करणेसाठी भारतीय मुदतीचा कायद्यामध्ये विशिष्ठ कालावधीचे बंधन अथवा तरतुद नाही. सी.पी.सी. मध्ये वा इतर कायद्याचे तरतुदी मध्ये समन्स लागू झालेपासून ९० दिवसात कैफियत दिली

नाही तर "कैफियत नाही" असा अलिखीत तरतुद नाही. तसेच "कैफियत नाही" हा झालेला आदेश रद्दबातल करणेसाठी झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी स्वतंत्र अर्ज देणेची आवश्यकता नाही. परंतू याकामी कोणत्याही प्रकारचे तांत्रिक तुटी राहु नयेत याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करीत आहे. तरी प्रतिवादी नं. ६ यांचे विरुध्द झालेला "लेखी कैफियत नाही" चा आदेश रद्दबातल व्हावा व प्रतिवादी नं. ६ यांना लेखी कैफियत नाही देणेस परवानगी मिळावी. सबब, कैफियत नाही असा झालेला आदेश आव्हानित करणेस जर काही कालावधी झाला असे मा. न्यायालयाचे मत झालेस त्याप्रसंगी झालेला विलंब माफ करणेत यावा.

३. त्यांनी पुढे असे कथन केले की, मुळ दावेची कामी स्वतंत्र कैफियत देणेची माहिती प्रतिवादी नं. ६ यांना नव्हती व त्यांना तसा सल्ला मिळालेला नव्हता. त्यामुळे अजानतेपणामुळे व नकळत मुदतीत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी नं. ६ यांनी हेतुपुरस्कर कैफियत देणेस विलंब केलेला नाही. निव्वळ प्रतिवादी नं. ६ ला दावेची स्वतंत्र कैफियत देणेची माहिती मिळाली नसलेमुळे मुदतीत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी नं. ६ ची कैफियत देणेस झालेला विलंब माफ केलेस प्रस्तुत कामी गुणदोषावर न्याय निवाडा करणेस न्यायालयास सुलभ व सोयीस्कर होणार आहे व त्यामुळे पारदर्शक व गुण दोषावर न्यायनिवाडा करणे शक्य होणार आहे. जर प्रतिवादी नं. ६ ला कैफियत देणेस झालेला तथाकथीत विलंब माफ केला नाही तर प्रतिवादी नं. ६ यांचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट जर प्रतिवादी नं. ६ यांस कैफियत देणेस झालेला तथाकथीत विलंब माफ होऊन कैफियत रेकॉर्डवर घेतलेस वादीचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही वा वादीचे हक्कदार कोणत्याही प्रकारे विपरीत परिणाम होणार नाही.

४. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. ६ यांना दावेस स्वतंत्र कैफियत देणेची आहे याची माहिती मिळाली नव्हती. तसेच वादीने दि. २४/०१/२०२३ ला तुर्तातुर्त मनाई अर्ज चालविणेचे नाही असे लिहुन दिलेले आहे. भारतीय मुदतीचे कायद्यामध्ये कैफियत देणेची मुदत नमुद नाही. तसेच "लेखी कैफियत नाही" चा आदेश रद्दबातल करणेसाठी विशिष्ठ कालावधी नमुद नाही. सी.पी.सी. ऑर्डर ८ रुल १ मधील तरतुद ही पुर्णत: सुचना/मार्गदर्शक असून ती

बंधनकारक नाही. त्यामुळे याकामी भारतीय मुदतीचा कायद्याचे तरतुदी अंतर्गत कोणताही विलंब झालेला नाही. सबब, सदरचा विलंब माफी अर्ज मंजुर केलेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार संबंधितांना पुर्ण संधी देऊन गुण दोषावर न्याय-निवाडा केलेप्रमाणे होणार आहे. जर विलंब माफी अर्ज मंजुर केला नाही तर प्रतिवादी नं. ६ यांचेवर अन्याय होऊन न्यायापासुन त्यांना कायमचे वंचित राहावे लागणार नाही. याउलट जर विलंब माफी झालेस व संबंधितांना सुनावणीची संधी दिलेस मा. न्यायालयाला कायद्याचे तरतुदीनुसार गुण-दोषावर निवाडा करणेस मदत होणार आहे. जर याकामी तांत्रिकदृष्ट्या झालेला विलंब माफ झालेस प्रतिवादी नं. ६ यांचे हक्क संरक्षित/ अबाधित रहाणार आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. ६ यांना त्याचे कायदेशीर हक्क व अधिकार शाबित करता येणार आहेत. प्रतिवादी नं. ६ यांनी हेतूपुरस्कर वा जाणून बुजूण विलंब केलेला नसलेने तांत्रिकदृष्ट्या झालेला विलंब माफीस सबळ व संयुक्तिक कारण घडलेले आहे. सबब, वरील सर्व मुद्दयांचा सारासार नायिक बुध्दीने विचार करता या कामी प्रतिवादी नं. ६ यास समन्स बजावणी पासून कैफियत दाखल करणेस आजअखेर तांत्रिक दृष्ट्या ७ वर्षे ४ महिने व २८ दिवसांचा व लेखी म्हणणे नाही / कैफियत नाही म्हणुन आदेश पारीत होवून कैफियत देणेस ९ महिने १९ दिवसांचा विलंब झालेला विलंब माफ करणेत यावा.

५. यातील वादी तर्फे नि. ८५ वर प्रतिवादी नं. ६ यांचे विलंब माफी अर्जास म्हणणे दाखल केले असुन त्यांनी प्रस्तुतचा अर्ज व त्यातील मजकुर खोटा व बेकायदेशीर स्वरुपाचा असुन तो वादी यांना मान्य व कबुल नाही. सदर अर्जात प्रतिवादी नं. ६ यांनी त्यांना दि.०९/०८/२०१७ रोजी दावेचे समन्स लागु झाले आहे ही बाब मान्य व कबुल केलेली आहे. यातील प्रतिवादी नं. १ ने देखिल मुदतीत कैफियत न दिलेने त्यांची कैफियत पटलावर घेणेकरिता योग्य तो दंड करुन त्याची कैफियत पटलावर आहे. मात्र त्यानंतर देखिल प्रतिवादी यांनी योग्य ती कायदेशीर तरतुदींचे पालन केलेले नाही. सदर अर्जात कैफियत दाखल करणेस ७ वर्षे ४ महिने २८ दिवसांचा विलंबाला तांत्रीकदृष्ट्या असे नामकरण अनेकवेळा करुन केवळ प्रतिवादी यांना कैफियत देणे आवश्यक असते यांची माहिती मिळाली नाही असे कायद्याला अभिप्रेत नसणारे कारण नमुद केलेले दिसुन येते ते न्यायोचित नाही.

६. वादी व प्रतिवादी तर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी नं. ६ यांना दि. ०९/०८/२०१७ रोजी दाव्याचे समन्स लागु झालेले दिसत आहेत. त्यानंतर प्रतिवादी नं. ६ यांनी वादी यांच्या तुर्तातुर्त मनाई अर्जास लेखी म्हणणे दाखल केलेले आहे. सदरकामी प्रतिवादी नं. ६ हे वकिलांमार्फत हजर झालेले होते. त्यामुळे दाव्याचे कामी स्वतंत्र कैफियत देणे आवश्यक होते याची माहिती व कल्पना त्यांना नसल्याचे कथन योग्य व न्यायोचित नाही. प्रतिवादी नं. ६ यांनी मुदतीत म्हणणे दाखल न केल्याने त्यांचेविरुध्द म्हणणे नाहीचा आदेश दि. १३/०२/२०२४ रोजी पारित झालेला आहे. परंतु प्रतिवादी नं. ६ यांना दाव्याचे समन्स लागु होवुन कैफियत देणेची मुदत वगळता प्रतिवादींना म्हणणे दाखल करणेसाठी ७ वर्षे ४ महिने व २८ दिवस इतका विलंब झालेला आहे. प्रतिवादी नं. ६ यांनी अर्जात नमुद केलेली कारणे योग्य व संयुक्तिक नाहीत परंतु प्रतिवादी नं. ६ यांचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास या दाव्याचे न्यायनिर्णयासाठी फायदा होणार आहे. तसेच दाव्यातील गुंतागुंत देखिल टाळता येणार आहे. वरील चर्चेस अनुसरुन प्रतिवादी नं. ६ यांचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. नि. ८४ वरील अर्ज प्रतिवादी नं. ६ यांनी वादींना रुपये ७,०००/- इतकी कॉस्ट पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shraddha Dinkar Bagal
Date: 2025.03.05 13:37:27 +0530

ठिकाण : शाहूवाडी (एस.डी. बागल)

दिनांक : ०४/०३/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

मलकापूर-शाहूवाडी